# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/६१

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दिनांक २५ जून, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची चौथी सभा मंगळवार दिनांक २५ जून, २०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता आभासी माध्यमाने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | उपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | उपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली**

**अल्बर्ट रुडी**

ऑस्कर पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते अल्बर्ट एस. रुडी यांचे दिनांक २९ मे, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षाचे होते.

**प्रभा शिवणेकर**

लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचे दिनांक १ जून, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षाच्या होत्या.

**चंद्रकांत कपिलेश्वरी**

किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक आणि रचनाकार पंडित चंद्रकांत कपिलेश्वरी यांचे दिनांक २ जून, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

**विल्यम ॲंडर्स**

माजी अंतराळवीर विल्यम ॲंडर्स यांचे दिनांक ८ जून, २०२४ रोजी विमान अपघातात निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

**रामोजी राव**

दिग्गज माध्यमकर्मी आणि रामोजी ग्रुपचे अध्यक्ष सीएच रामोजीराव यांचे दिनांक ८ जून, २०२४ रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षाचे होते.

**अमोल काळे**

मुंबई क्रिकेट संघाचे अध्यक्ष अमोल काळे यांचे दिनांक १० जून, २०२४ रोजी न्यूयॉर्क येथे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ४७ वर्षाचे होते.

**मधू देवळेकर**

ज्येष्ठ भाजप नेते व माजी आमदार मधू देवळेकर यांचे दिनांक १२ जून, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते.

**प्रकाश माधव जोशी**

ठाणे येथील प्रकाश माधव जोशी यांचे दिनांक १३ जून, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक २८ मे,२०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | दिनांक २८ मे, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले, तसेच बाब क्र. २२ मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.<br><br>"व्यवस्थापन परिषद सभासद श्री. संदीप सिंग यांनी विद्यापीठाच्या राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर अतुलनीय योगदान देण्याऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या जन्मदिवस / पुण्यतिथि निमित्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्यांना सादर श्रद्धांजली/ अभिवादन समर्पित करावे असे सुचविले, सदर बाब सर्वानुमते मान्य करण्यात आली. तसेच फोर्ट परिसरातील जनसंपर्क आधिकारी यांनी बाबतची पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>"आज व्यवस्थापन परिषदेच्या बैठकी दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती आहे. त्यामुळे चर्चेच्या अनुषंगाने सर्वानुमते असे ठरले कि विद्यापीठाच्या राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर अतुलनीय योगदान देण्याऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या जयंती / पुण्यतिथि निमित्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्यांना सादर अभिवादन/ श्रद्धांजली समर्पित करावे. सदर बाब सर्वानुमते मान्य करण्यात आली. तसेच त्यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला सुरु करावी असेही ठरले. आणि फोर्ट परिसरातील जनसंपर्क अधिकारी यांनी याबाबतची पुढील कार्यवाही करावी, असे ठरले." | PRO |
| २ | व्यवस्थापन परिषद दिनांक २५ ऑक्टोबर, २० नोव्हेंबर २०२३ व १३ मार्च २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक २५ ऑक्टोबर, २० नोव्हेंबर २०२३ व १३ मार्च २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आले. | |
| ३ | 1. Give the permission for digging ring well in Kalina Campus whose location will be fixed in consultation with IPEMD.<br>2. Finance for ring well construction will be borne by UM-DAE CEBS.<br>3. Correspondence with the BMC office will be done through IPEMD.<br>4. All the permissions and follow up with BMC will be taken by UM-DAE CEBS.<br>5. University of Mumbai will use the water from well whenever required. | IPEMD<br>DRVAD |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या कालिना परिसरात विहीर खोदण्याचा प्रस्ताव खालील अटी -शर्तीच्या अधीन राहुन मान्य करण्यात आला.<br>१. सर्व खर्च UM-DAE CEBS करेल.<br>२. त्यासाठी लागणारी बृहन्मुंबई महानगरपालिकाची परवानगी UM-DAE CEBS यांनी आणावी.<br>३. मुंबई विद्यापीठाच्या कोणत्याही विभागात आवश्यकता असेल तेव्हा विहिरीतील पाणी वापरले जाईल.<br>४. उपरोक्त बाबत UM-DAE CEBS कडून हमीपत्र घेण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | The matter regarding appointment of Dr. Mayank Vahia as distinguished Professor at Mumbai University Accelereter Centre, University of Mumbai is placed before the Management Council for its consideration, as per rules. | शैक्षणिक नेमणूक आणि गुणवत्ता |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला कि डॉ. मयांक वाहिया यांना Mumbai University Accelereter Centre, University of Mumbai येथे Emeritus Professor या पदासाठी रुपये ३०,०००/- (तीस हजार फक्त) या मानधनावर ११ महिन्यासाठी नेमण्यात यावे. तसेच पुन्हा मुदत वाढ देताना विभाग प्रमुखाकडून आधीच्या कामाची शिफारस घेण्यात यावी. | |
| ५ | मुंबई विद्यापीठातील जमनालाल बजाज व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था येथील "संचालक" पद विद्यापीठाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र.मशिमाक/ विशिमाक/ तंत्रशिक्षण / ११/२०२० - २०११, दिनांक: ११ जानेवारी, २०२१ आणि शासन निर्णय क्र.सावेआ-११/ प्र.क्र.४४/११/ता.शि.-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ मधील कलम ५.२ (F) अन्वये जाहिरात देऊन पाच वर्षाच्या कालावधी करिता भरणे बाबत AICTE ने निर्गमित केलेल्या व शासनाने मान्य केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर पदाची शैक्षणिक अर्हता अनुभवानुसार जाहिरात देऊन पद भरण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. | शैक्षणिक नेमणूक आणि गुणवत्ता |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील जमनालाल बजाज व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था येथील "संचालक" पद विद्यापीठाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र.मशिमाक/ विशिमाक/ तंत्रशिक्षण / ११/२०२० - २०११, दिनांक: ११ जानेवारी, २०२१ आणि शासन निर्णय क्र.सावेआ-११/ प्र.क्र.४४/११/ता.शि.-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ मधील कलम ५.२ (F) अन्वये जाहिरात देऊन पाच वर्षाच्या कालावधी करिता भरणे बाबत AICTE ने निर्गमित केलेल्या व शासनाने मान्य केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर पदाची शैक्षणिक अर्हता अनुभवानुसार जाहिरात देऊन पद भरण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आली. जमनालाल बजाज व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था हि जागतिक कीर्तीची संस्था असून त्या संस्थेला निवड प्रक्रियेतून प्रभावी नेतृत्व मिळावे व संस्था मोठी व्हावी अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.<br>तसेच जाहिरात देउन पद भरण्यास कालावधी लागेल, तत्पूर्वी पद रिक्त झाल्यास तोपर्यंत ते पद भरण्याचे आधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| ६ | श्री. नवनाथ ढवळे पोलीस उप आयुक्त बृहन्मुंबई मुख्यालय-२ बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांना माहे जून- २०२४ पासून पुढील ४ महिन्याकरिता मुंबई पोलीस भरती २०२२-२३ प्रक्रियेकरिता मुंबई विद्यापीठ विद्यानगरी परिसरातील खालील नमूद जागा नाममात्र शुल्क रु. ५,००,०००/- या दराने देण्याबाबत पुढील आदेशास्तव सादर करण्यात येत आहे.<br>➢ मुंबई विद्यापीठातील उत्तरव्दार ते महात्मा फुले भवन जवळील ( डॉ. बाबासाहेब आंबडेकर संशोधन केंद्र वगळून) मोकळे मैदान.<br>➢ डॉ बाबासाहेब आंबडेकर भवन समोरील मोकळे मैदान<br>➢ स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मधील बहूउद्देशीय सभागृह | प्रशासकीय विभाग<br>Director, Sports and Physical Education<br>DR-FAD |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठातील मरीन लाईन येथील स्पोर्ट्स पॅव्हेलियन खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून १ जुलै २०२४ ते १४ ऑगस्ट २०२४ या कालावधी पर्येंत "मुंबई पोलीस भरती २०२२-२३" प्रक्रियेकरिता एकत्रित शुल्क रुपये १०,००,०००/- (दहा लाख रुपये फक्त) या दराने देण्यास मान्यता देण्यात आली. खालील अटी टाकून मान्यता देण्यात यावी, आठ दिवसाच्या नोटीस कालावधीने ही मान्यता रद्द करण्याचे अंतिम अधिकार विद्यापीठाकडे राहतील.<br>मुंबई विद्यापीठातील मरीन लाईन येथील स्पोर्ट्स पॅव्हेलियन खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून १ जुलै २०२४ ते १४ ऑगस्ट २०२४ या कालावधी पर्येंत "मुंबई पोलीस भरती २०२२-२३" प्रक्रियेकरिता एकत्रित शुल्क रुपये १०,००,०००/- (दहा लाख रुपये फक्त) या दराने देण्यास मान्यता देण्यात आली. खालील अटी टाकून मान्यता देण्यात यावी, आठ दिवसाच्या नोटीस कालावधीने ही मान्यता रद्द करण्याचे अंतिम अधिकार विद्यापीठाकडे राहतील.<br>१) ॲथलेटिक्स मधील मैदानावर फक्त धावणे क्रीडा प्रकार घेण्यासाठी परवाणगी असेल, त्याच बाबरोबर उडीच्या बाबी व फेकीच्या बाबी घेण्यास परवाणगी नाही.<br>२) ॲथलेटिक्स मैदानावर कोणत्याही प्रकारचा खड्डा करणे अथवा कोणतीही वस्तू रोवता करता येणार नाही.<br>३) १०० मी, २०० मी, ४००मी धावणे क्रीडा प्रकारासाठी ब्लॉक वापरावे, जेणे करून मैदानाचा पृष्ठभाग खराब होणार नाही.<br>४) धावणे क्रीडा प्रकारामध्ये फक्त ६ mm अथवा त्यापेक्षा कमी असणारे ॲथलेटिक्स स्पाईकच वापरावेत.<br>५) क्रीडा संकुलनामध्ये पार्किंग दिली जाणार नाही.<br>६) क्रीडा संकुलनामध्ये प्र-कुलगुरुंचे निवासस्थान असल्यामुळे मा. प्र.कुलगुरूच्या व प्रशासकीय गाड्या येणे/ जाणे चालू असणार आहे.<br>७) ऑगस्ट महिन्यामध्ये विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा सुरु होत असल्यामुळे क्रीडा संकुलनामध्ये शिक्षक, खेळाडू, मार्गदर्शन यांचे स्पर्धा नोंदणीची कामे चालू असणार आहेत.<br>८) क्रीडा संकुलनात विद्यापीठ क्रीडा मंडळाचे कार्यालय आहे, त्यामुळे कार्यालय कामकाजावर परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी.<br>९) क्रीडा संकुलनामध्ये स्वच्छतागृह व पाणी मर्यादित आहेत, त्यामुळे फिरती स्वच्छतागृह व पाण्याची व्यवस्था करावी.<br>१०) क्रीडा संकुलनामधील मालमत्ता खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>११) क्रीडा संकुलनामधील आपणास वापरायच्या वेळा विद्यापीठ प्रशासनाबरोबर निश्चित कराव्यात. | |
| ७ | To Seek the permission from the Management Council the following two Agreement between<br>A) Lomonosov Moscow State University (Russian Federation)<br>B) Federal State Budgetary Education Institution of Higher Education Lononosov Moscow State University and University of Mumbai, Mumbai (Both copies enclosed) | Research Administration & Promotion Cell |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मुंबई विद्यापीठाशी संबधीत खालील दोन्ही सामंजस्य करार व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आले.<br>A) Lomonosov Moscow State University (Russian Federation)<br>B) Federal State Budgetary Education Institution of Higher Education Lononosov Moscow State University and University of Mumbai, Mumbai | |
| ८ | मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित व विनाअनुदानित विभाग/संस्था / केंद्र येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता हंगामी सहायक प्राध्यापकांची जाहिरातीद्वारे निवड समितीमार्फत सहा महिन्यांकरिता किंवा शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत पदभरती करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे. | शैक्षणिक गुणवत्ता व हमी विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध अनुदानित व विनाअनुदानित विभाग/संस्था / केंद्र येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता हंगामी सहायक प्राध्यापकांची जाहिरातीद्वारे निवड समितीमार्फत सहा महिन्यांकरिता किंवा शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत पदभरती करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आला. याबाबत निवड समिती नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले. | |
| ९ | मुंबई विद्यापीठातील विविध विभाग आणि सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय येथील प्राध्यापक/संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य / अधिष्ठाता, सहयोगी प्राध्यापक/ उपग्रंथालय आणि सहायक प्राध्यापक/ग्रंथालय/ सहायक ग्रंथालय या संवर्गातील एकूण १५२ शिक्षकीय व समकक्ष पदे भरण्याबाबत जाहिरातींचा मसुदा तयार करण्यात आला असून, त्यास मान्यता मिळणेबाबत व त्याअनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबतची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे. | शैक्षणिक गुणवत्ता व हमी विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध विभाग आणि सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय येथील प्राध्यापक/संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य / अधिष्ठाता, सहयोगी प्राध्यापक/ उपग्रंथालय आणि सहायक प्राध्यापक/ग्रंथालय/ सहायक ग्रंथालय या संवर्गातील एकूण १५२ शिक्षकीय व समकक्ष पदे (शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली) भरण्याबाबत मान्यता देण्यात आली. याबाबत निवड समिती सदस्य, विषय तज्ञ नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले. | |
| १० | मुंबई विद्यापीठाच्या बंदिस्त व मोकळया जागांकरिता भाड्याचे सुधारित दर लागू करण्यासाठी मार्गदर्शन मिळावे या बाबीस मंजुरीसाठी सादर | पायाभूत सुविधा नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभाग/ सामान्य प्रशासन विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि मुंबई विद्यापीठाच्या बंदिस्त व मोकळ्या जागांकरिता भाड्याचे सुधारित दर लागू करण्यासाठी सादर करण्यात आलेला शासन निर्णय दि. १६ ऑक्टोबर, २००३ रोजीचा निर्णय स्वीकारण्यात आला. व असाही निर्णय घेण्यात आला की शैक्षणिक उपक्रमाशिवाय इतर कुठल्याही राजकीय कार्यक्रमास मुंबई विद्यापीठातील कोणतीही जागा देण्यात येऊ नये.<br>तसेच चर्चेच्या अनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयामध्ये सेवाभावी संस्था याना रु. ५/- प्रति चौ.फू. प्रति महिना नमूद करण्यात आला आहे. शासन निर्णयामध्ये नमूद ५% दरवाढ प्रमाणे **13.88**/- प्रति चौ.फू. प्रति महिना प्रमाणे घेता येईल. मुंबई विद्यापीठाच्या वसतीगृहासाठीच्या कँटीन टेंडर प्रक्रियेमध्ये याबाबतीचा उल्लेख करण्यात यावा. व कँटीन टेंडर प्रक्रियेमध्ये पाणी, लाईट, फर्निचर, इतर उपकरणे यांची व्यवस्था संबंधितांनी स्वतः करावी व त्याची देयके स्वतः अदा करावी. तसेच फायर, गॅस सेफ्टी,एफ.डी.ए. लायसन्स यांची जबाबदारी संबंधितांची असेल. वसतीगृहातील कँटीन मध्ये विद्यार्थी व विद्यापीठ कर्मचारी यांना सवलतीच्या दरात सेवा देण्यात यावी असे ठरले. | |
| ११ | मुंबई विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभागास १० लाखांपर्यंत ऑफलाईन निविदामार्फत कामे करण्याची परवानगी मिळावी या बाबीस मंजुरीसाठी सादर | पायाभूत सुविधा नियोजन] अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | सदर बाब वित्त व लेखा समितीच्या दिनांक २५ जून २०२४ रोजीच्या आयत्यावेळी आलेली बाब क्र.५ मध्ये आलेली आहे. त्यामुळे सदर बाब मागे घेण्यात आली. | |
| १२ मा. | श्री. रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री, भारत सरकार यांचेकडून प्राप्त मा- कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे या नामविस्ताराबाबत पुढील आदेशार्थ सादर करण्यात येत आहे | विद्यानगरी प्रशासकीय विभाग, पायाभूत सुविधा, नियोजन व अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर येथील शाहीर अण्णा भाऊ साठे अतिथिगृहाचे नामविस्तार **"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अतिथीगृह"** असे करण्यास मान्यता देण्यात आली. व सदर अतिथीगृहाच्या दुरुस्तीसाठी आणि डागडुजीसाठी मा. नामदार श्री. रामदास आठवले, सामाजिक न्यायमंत्री, भारत सरकार यांना प्रस्ताव पाठवावा, असे ठरले. | |
| १३ | Permission to the Director of CDOE to appoint subject coordinator/s on the consolidated honorarium of Rs.10,000 per month to ensure the smooth functioning of CDOE. | Centre for Distance and Online Education, P.V.C Office |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की, सब्जेक्ट कॉर्डीनेटर (विषय समन्वयक) या पदासाठी जॉब प्रोफाइल, कालावधी, तसेच पॉलिसी डिसिजन संबंधित निर्णय घेण्याचे सर्व अधिकार प्र-कुलगुरूंना देण्यात आले. | |
| १४ | के.व्ही. पेंढारकर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, डोंबिवली, जि. ठाणे या महाविद्यालयाविरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने श्री. शशिकांत सावळे यांनी दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (१५) नुसार महाविद्यालयाविरुद्ध कारवाई करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग<br>DR. Legal Cell |

| | | |
|---|---|---|
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि श्री. शशिकांत सावळे, निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश यांनी सादर केलेला अहवाल सर्वानुमते स्वीकारण्यात आला. सविस्तर चर्चेच्या अंती महाविद्यालय विरोधात प्राप्त तक्रारींबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ तरतुदीनुसार सदर महाविद्यालयावर प्रशासक नियुक्त करण्याकरिता कुलगुरूंमार्फत राज्य शासनाला शिफारस करावे असे सर्वानुमते ठरले. या ठरावास संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी हि समर्थन केले. राज्य शासनाकडे शिफारस करताना न्यायालयाचा अवमान होणार नाही आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून प्रशासक नेमण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.<br>सदर महाविद्यालय प्रशासक मंडळ नियुक्त करण्या विरुद्ध न्यायालायात जाऊ शकते, यासाठी विद्यापीठाने देखील पुढील प्रक्रियेसाठी कॅव्हीयेट दाखल करावे. तसेच हा ठराव याच बैठकीत मान्य करण्यात आला. | |
| १५ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने सदर प्रक्रियेच्या तांत्रिक कामकाजाकरिता त्वरित पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी जेणे करून प्रवेश नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभाग काम जलद गतीने करण्यात येईल. | Admission, Enrolment, Eligibility, & Migration Department |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि सदर बाब अधिक माहिती सह पुन्हा सादर करण्यात यावी. | |
| १६ | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee Meeting held on 24 June, 2024 under Section 94(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | It was resolved that Minutes of Finance and Accounts Committee meeting held on 24 June,, 2024 be accepted. | |
| १७ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 24 June, 2024 and to place item before Management Council. | I.P.E.M.D. |
| ठराव | It was resolved that Minutes of Building and Works Committee meeting held on 24 June,, 2024 be accepted. | |
| १८ | Therefore UGC directive may be adopted for renaming our centre as UGC Malaviya Mission Teacher Training Centre University of Mumbai. | UGC MMTTCUM |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र. D.O.No.F.1-5/2022 (CBS/Faculties) Pt.File.Dt.5th October,2023 प्रमाणे UGC Human Resource Development यांचे नाव **UGC Malaviya Mission Teacher Training Centre, University of Mumbai (UGC MMTTC, University of Mumbai** असे बदलण्यास मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| १९ | चिंचणी तारापूर एज्युकेशन सोसायटीचे,श्री. पुरुषोत्तमदास लालदास श्रॉफ कला वाणिज्य महाविद्यालय चिंचणी, ता डहाणू. जि. पालघर - ४०१ ५०३ च्या ऐवजी **"चिंचणी तारापुर एज्युकेशन सोसायटी संचालित, श्री. पुरुषोत्तम लालदास श्रॉफ कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवस्थापण महाविद्यालय, चिंचणी "** असे नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे तसेच सदर शासनाकडाठविण्याची परवानगी देण्यात यावी. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि सदर बाब अधिक माहिती सह पुन्हा सादर करण्यात यावी. | |
| २० | प्रगत सामाजिक शिक्षण सोसायटीच्या संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विज्ञान महाविद्यालय, अँड गुरुनाथ कुलकर्णी वाणिज्य आणि व्यवस्थापन महाविद्यालय च्या ऐवजी (एस.के.सी. डिग्री कॉलेज) असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे तसेच सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची परवानगी देण्यात यावी. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि सदर बाब अधिक माहिती सह पुन्हा सादर करण्यात यावी. | |
| २१ | Considering the high number of cases to attend the University matters which are the filed before the Hon'ble Bombay High Court, Mumbai, Bench Aurangabad, Nagpur Bench. the name of Adv. Amit Shashikant Savale can be considered to be empanelled in the list of panel of Advocate of University of Mumbai as he is practicing before Bombay High Court, Mumbai as well as Aurangabad Bench of Bombay High Court. | Legal /RTI & Grievance Redressal Section |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की ॲड. अमित शशिकांत सावळे यांना मुंबई विद्यापीठाने ठरवलेले दर पत्रकानुसार विद्यापीठाच्या **University Panel of Advocates** मध्ये समावेश करण्यात यावा. | |
| २२ | शरद कोकाटे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार क्रमांक- ४२०, मुंबई - ४०० ०३२, यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.५२/विशि-५, दिनांक २४/०६/२०२४ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात येत आहे. | निवडणूक विभाग |
| ठराव | याबाबत सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला कि दिनांक १ जुलै २०२४ रोजी आचारसंहिता संपल्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. | |
| २३ | डॉ. आरती वानखेडे, यांचे विरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारींवर नि:पक्षपाती पणे सखोल चौकशी करून समितीने सादर केलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व योग्य तो निर्णय घेण्याकरिता सादर करण्यात येत आहे. | महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला कि डॉ. आरती वानखेडे, यांचे विरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारींवर नि:पक्षपाती पणे सखोल चौकशी करण्यासाठी नियुक्त निवृत्त न्यायाधीश श्री. शशिकांत सावळे यांनी सादर केलेला अहवाल स्वीकारण्यात आला. त्याप्रमाणे संबंधित विभागाने तात्काळ पुढील कार्यवाही करावी. सदर संस्था विद्यापीठाच्या निर्णयाविरुद्ध न्यायालयात जाण्याची शक्यता आहे, त्यामुळे विद्यापीठाने देखील याबाबत न्यायालयात कॅव्हीयेट दाखल करावे असे ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| २४ | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग यांचे पत्र क्र.संलग्नता/आय.सी.डी.२०२४-२५/८१८, दिनांक १८ जून २०२४, नुसार लेट श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस् च्या पत्यात बदल करण्याच्या प्रस्तावात विभागाकडून "विवा" शब्द दर्शविण्यात आला आहे, त्याप्रमाणे बदल करण्याची विनंती केली आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | दिनांक २५ मे, २०२३ रोजी च्या बाब क्र ९ मध्ये खालील प्रमाणे ठराव दिला आहे.<br>"लेट श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे, विवा भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस् , सर्वे नं. ३१४, विवा कॉलेज, रोड, विरार(प.) जि. पालघर- ४०१ ३०३ या महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करण्यासाठी २५,०००/- शुल्क घेण्यात यावे व शासनास कळविण्यात यावे, असे ठरले"<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>"लेट श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे, भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस् , सर्वे नं. ३१४, विवा कॉलेज, रोड, विरार(प.) जि. पालघर- ४०१ ३०३ या महाविद्यालयाच्या पत्यात बदल करण्यासाठी २५,०००/- शुल्क घेण्यात यावे व शासनास कळविण्यात यावे, असे ठरले" | |
| २५ | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग यांचे पत्र क्र.संलग्नता/आय.सी.डी.२०२४-२५/७४८, दिनांक ७ जून २०२४, नुसार कै. नारायण मेधाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थाच्या ठराव बदल करण्यासाठी विनंती केली आहे. | |
| ठराव | दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी च्या बाब क्र ४ मध्ये खालील प्रमाणे ठराव दिला आहे.<br><br>"असा ठराव पारित करण्यात आला की, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई [Late Narayan Meghaji Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] ऐवजी ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था मुंबई [N.M. Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] असा बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>५) महाविद्यालयाचे नॅक मुल्याकंन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी. स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर माहिती भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा."<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>"असा ठराव पारित करण्यात आला कि, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई [Late Narayan Meghaji Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] ऐवजी ना.मे.लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था मुंबई [N.M. Lokhande Maharashtra Institute of Labour Studies, Mumbai] असा बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा." | |
| २६ | 1) Permission to establish of ' Model Career Centre 'of District Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra at Ground Floor of Vidyapeeth Vidyarthi Bhavan.<br>2) Permission to provide the 1000 sq.ft. area (4 rooms) of the ground floor of Vidyapeeth Vidyarthi Bhavan, University of Mumbai, 'B' Road,Churchage, Mumbai to establish 'Model Career Centre ' of District Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra on lease for 1 year.<br>3) Permission to Initiate the procedure for obtaining MoU between Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra and University of Mumbai. | |
| ठराव | सहायक आयुक्त, प्र., जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र( मुंबई उपनगर), मुंबई यांच्या पत्र जा.क्र.११/जिकौविरोवउमाके.मु.उ./एमसीसी/१०५६-५७/२०२४, दिनांक ११ जून २०२४ च्या पत्रानुसार मुंबई विद्यापीठात एक अद्यावत जिल्हा समुपदेशन केंद्र सुरु करण्यासाठी मुंबई विद्यापीठात जागेची मागणी केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या सहकार्यातून उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार व कौशल्य विकासाची संधी उपलब्ध होणार आहे, त्यामुळे खालील बाबी मान्य करण्यात आल्या.<br>1) Permission to establish of ' Model Career Centre 'of District Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra at Ground Floor of Vidyapeeth Vidyarthi Bhavan.<br>2) Permission to provide the 1000 sq.ft. area (4 rooms) of the ground floor of Vidyapeeth Vidyarthi Bhavan, University of Mumbai, 'B' Road,Churchage, Mumbai to establish 'Model Career Centre ' of | |

| | | |
|---|---|---|
| | District Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra on lease for 1 year.<br>**3)** Permission to Initiate the procedure for obtaining MoU between Employment and Entrepreneurship Guidance Cell, Government of Maharashtra and University of Mumbai. | |

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मां. कुलगुरू